राष्ट्रपती

# डॉ. झाकीर हुसेन

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ना-वा
दा. क्र. १२७४२



IRBK-0112742
IRBK-0112742

बा. ल. पाठक प्रकाशन, मोतीबाजार, मुंबई २

३६१७ ७६५३८ बा. वा. ३०/३/७९.

# राष्ट्रपती

# डॉ. झाकिर हुसेन

बालवाङ्मय
अनुक्रम ७६५३८ ... दि.
क्रमांक 3६१७ ..... नोंद दि. 30/3/79
८१०.८६०
१२०४२.

लेखक

**सदानंद चेंदवणकर**

बा. क्र. १२७७३ नों दि.
बा. ११
IRBK-0112742
IRBK-0112742

बा. ल. पाठ[...] [...]ुंबई २

मुद्रक व प्रकाशक :
द. वि. पाठक
जगदीश्वर प्रिंटिंग प्रेस
गिरगाव, गायवाडी,
मुंबई ४

प्रथमावृत्ती
मे १९६९

सर्व हक्क
प्रकाशकाचे स्वाधीन

# दोन शब्द

भारताचे राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन नुकतेच दिवंगत झाले. अवघी दोनच वर्षांची त्यांची राष्ट्रपतिपदाची कारकीर्द पण त्या अल्पकाळात त्यांनी भारतीयांमध्ये चांगलीच लोकप्रियता मिळविली होती. डॉ. झाकिर हुसेन यांच्या जीवनकार्यांची आणि आवडी-निवडी, छंद इत्यादींची थोडक्यात माहिती मुलांना व्हावी या हेतूने हे छोटेखानी पुस्तक लिहिले आहे. आमचे परमस्नेही बा. ल. पाठक प्रकाशनाचे श्री. भालचंद्र पाठक, यांनी हे पुस्तक त्वरीत प्रकाशित केले याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

दैनिक मराठाने आपल्याकडील ब्लॉक्स या पुस्तकात समाविष्ट करण्या-साठी दिले त्याबद्दल त्यांचेही आभार.

—सदानंद चेंदवणकर

# • राष्ट्रपतिपदासाठी निवड

डॉ. झाकीर हुसेन हे भारताचे तिसरे राष्ट्रपती होत. स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. बाबू राजेंद्रप्रसाद हे होत. दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे होत. राष्ट्रपतिपदावरची पाच वर्षांची मुदत संपल्यावर पुन्हा निवडणुकीस उभे रहाण्यास त्यांनी नकार दिला. प्रकृति–अस्वास्थ्य हेच पुन्हा राष्ट्रपतिपदावर न रहाण्याचे त्यांचे खरेखुरे कारण. सध्या ते दक्षिणेतील आपल्या निवासस्थानी विश्रांती घेत आहेत.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कारकिर्दीत उपराष्ट्रपति-पदावर डॉ. झाकिर हुसेन हे होते. आपल्या राज्यघटनेत नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रपतींची निवडणूक ता. ६ मे १९६७ रोजी यशस्वीपणे पार पडली. या पदासाठी झालेली निवडणूक ही प्रथमच होय. या निवडणुकीचा निकाल ता. ९ मे १९६७ रोजी लागला. या निवडणुकीसाठी डॉ. झाकिर हुसेन, माजी सर-न्यायाधीश कोका सुब्बाराव यांच्यासह १७ उमेदवार होते. उरलेल्या १५ पैकी काही तर सामान्य व्यक्ती होत्या. त्यांपैकी ९ जणांना तर एकही मत मिळाले नाही, ६ जणांना २३२ ते १३६९ पर्यंत मते पडली. राष्ट्रपतींच्या निवडणुकीचे एकूण मतदार सुमा

४१३० होते. त्यांपैकी ७५९ संसदसदस्य व ३३७० विधानसभासदस्य होते. विधानसभासदस्यांची व संसदसभासदांची मते मुख्य दोन उमेदवारांना पुढीलप्रमाणे पडली.

| | डॉ. झाकिर हुसेन | के. सुब्बाराव |
|---|---|---|
| विधानसभा – | २,१३,७७२ | २७,३८४३ |
| संसद – | २,५७,४७२ | १६,०१२८ |
| | ४,७१,२४४ | ४३,३९७१ |

याप्रमाणे निकाल लागून डॉ. झाकिर हुसेन राष्ट्राध्यक्षपदी ता. ९ मे १९६७ रोजी निवडून आले व १३ मे रोजी विराजमान झाले. त्यांना कॉंग्रेसपक्षातर्फे उभे करण्यात आले होते. त्यांना मिळालेल्या मतांवरून ते किती लोकप्रिय होते याची चांगलीच कल्पना येते.

## २ • जन्म

डॉ. झाकिर हुसेन हे धर्माने सुनी पंथीय मुसलमान असल्यामुळे त्यांच्या निवडीला विशेष अर्थ आहे. भारताचे समतोल व्यक्तित्व आणि निरपवाद सहिष्णुत्व या निवडीने जगाच्या निदर्शनाला आले. या देशात मुसलमानांवर अन्याय होतो अशी ओरड करण्यात पाकिस्तानच्या अयूबखानापेक्षा या देशातील राष्ट्रप्रेमी कम्युनिस्ट अधिक पुढे असतात. परंतु डॉ. झाकिर निवडून आल्यामुळे भारत हे निधर्मी आणि कुणावरही अन्याय न करणारे राष्ट्र आहे, हे जगाला कळून आले. त्यांची निवड ही भार-

ताच्या इतिहासात खरोखरच सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखी घटना आहे.

झाकिर हुसेन यांचा जन्म आंध्र राज्याची राजधानी जे हैद्राबाद शहर तिथे ८ फेब्रुवारी १८९७ मध्ये झाला. त्यांचे घराणे वायव्य सरहद्द प्रांतातील आफ्रिडी जमातीचे. उत्तरप्रदेशातील फरुकाबाद जिल्ह्यातील करीमगंज या खेड्यात झाकिर हुसेन घराणे १८ व्या शतकापासून स्थायिक झालेले होते. सुमारे सात पिढ्या या घराण्याने लष्करात घालविल्या होत्या. झाकिर हुसेन यांच्या वडिलांचे नाव फिदा हुसेन. त्यांनीच फक्त काय तो कायद्याचा अभ्यास केला आणि उद्योग करण्याच्या निमित्ताने हैद्राबादेस स्थलांतर करून तिथे वकिलीत आपला चांगला जम बसविला. ते आयने-इ-डेक्कन या कायदेविषयक पत्रिकेचे संपादक म्हणूनही चांगलेच गाजले होते.

छोट्या झाकिरांचे बालपण अतिशय लाडात गेले. लहानपणी त्यांची प्रकृती सशक्त होती. आपल्या सात भावंडात ते तिसरे होते.

## २ • शिक्षण

लहानपणी झाकिर हुसेन यांची शरीरप्रकृती बळकट होती. तेव्हा मोठेपणी हा मुलगा सैन्यात शिरून देशाची सेवा करील असे वाटत होते. पण योगायोग अगदीच वेगळा. सैनिक होण्याऐवजी राष्ट्रपतिपदावर ते आरूढ झाले.

झाकिर हुसेन यांचे अगदी सुरवातीचे शिक्षण घरीच झाले. त्यांना शिकविण्यासाठी इंग्लिश बाई येत असे. पुढे ते शाळेत

जाणार इतक्यातच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. झाकिर त्यावेळी अवघे नऊ वर्षांचे होते. वडिलांच्या निधनामुळे या कुटुंबाला हलाखीचे दिवस आले. अचानक परिस्थिती बदलली. दुःखाचे आणि दारिद्र्याचे चटके छोट्या झाकिरला बसू लागले. पण या साऱ्या संकटांना तोंड द्यायचे त्यांनी ठरविले. आपण प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ व्हावे ही वडिलांची इच्छा म्हणूनच की काय, ती इच्छा आपण पूर्ण करावयाचीच असा त्यांच्या मनाने ठाम निश्चय केला व तो सिद्धीस नेला.

१९०७ साली हैद्राबाद सोडून कुटुंबीय मंडळी उत्तरप्रदेशात इटावा येथे आली आणि मग तेथल्या इस्लामिया विद्यालयात झाकिर हे जाऊ लागले. शाळेत छोटे झाकिर अतिशय हुशार, कष्टाळू, मेहनती नि सालस विद्यार्थी म्हणून ओळखले जात. त्यामुळे शिक्षकांचे त्यांच्यावर भारी प्रेम. त्या शाळेचे प्राचार्य सैयद अल्ताफ हुसेन यांचा तर त्यांच्यावर भारी लोभ जडला. "या शाळेने व तेथल्या गुरुजनांनी मजवर उत्तम संस्कार केले" असे झाकिर वेळोवेळी म्हणत असत. या शाळेत ते अतिशय साधेपणाने व कडक शिस्तीत वावरले. त्या शाळेत अभ्यासाबरोबर अन्य कार्यक्रमांतही ते भाग घेत असत व चर्चा, वादविवाद, भाषण, लेखन यात सहभागी होत. त्यांची बुद्धी प्रथमपासून तीव्र व अभ्यासात लक्षही फार असे, यामुळे ते भराभर परीक्षा उत्तीर्ण होत गेले आणि अलिगड विद्यापीठात त्यांनी प्रवेश केला व १९२० साली त्या विद्यापीठाची एम्. ए. ची पदवी संपादन करून ते दिल्लीला आले. अर्थशास्त्र हा त्यांचा आवडता विषय.


या विषयात आणखी प्राविण्य मिळविण्यासाठी १९२५ साली ते जर्मनीला गेले आणि बर्लिन विश्वविद्यालयात त्यांनी अर्थशास्त्राचा आणखीन अभ्यास केला व अर्थशास्त्राची पदवी प्राप्त केली. १९२६ मध्ये त्यांनी डॉक्टरेटसाठी प्रबंध लिहिला व बर्लिन विद्यापीठाची पीएच. डी. पदवी मिळविली. त्यांनी १९ वर्षे विद्याव्यासंगात घालविली.

अर्नेस्ट सोम्बार्ट हे त्यांच्या अर्थशास्त्रविषयक तत्त्वज्ञानाचे गुरू होत. अर्थशास्त्र हे स्वतंत्र शास्त्र असले तरी मानवी जीवनापासून त्याची फारकत होऊ शकत नाही हा सुंदर विचार त्यांनी सोम्बार्टसाहेबापासूनच घेतला. सांस्कृतिक जीवनाप्रमाणे वेगवेगळ्या आर्थिक पद्धतींचेही सहजीवन शक्य आहे, असे ते अगदी तरुणपणापासून मानत आले होते. सर्व आर्थिक तत्त्वज्ञानातूनच अखेरीस सर्वसमावेशक अशी आर्थिक पद्धत उदयास येईल असा त्यांचा दृढ विश्वास होता.

## ४ • जमिया मिलियाची स्थापना

अलिगढ विद्यापीठात शिक्षण घेत असताना १९२० मध्ये म. गांधींनी देशात असहकारितेची चळवळ सुरू केली. त्यामधील राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यक्रमाचे झाकिर हुसेनना तेव्हा जे आकर्षण निर्माण झाले ते अगदी आमरणच. असहकाराच्या चळवळीत त्यांनी उडी घेतली व गांधीजींचे अनुयायित्व पत्करले. कॉंग्रेसच्या या चळवळीत त्यावेळी जे सुशिक्षित आले त्यांमध्ये डॉ. झाकिर

यांचे स्थान महत्त्वाचे होते. त्यांनी स्वतःला शिक्षणकार्याला वाहून घेतले. त्यांनी गांधीजींना आपले म्हणणे पटवून दिले आणि दिल्ली येथे १९२० त एक नवीन शिक्षणसंस्था स्थापन केली. तिचे नाव ' जमिया मिलिया. ' ही संस्था स्थापन करण्यासाठी त्यांनी गांधीजींचे मन वळविले होते. डॉ. झाकिर स्पष्टपणे सांगत की, केवळ राजकीय चळवळीने खरे राष्ट्रीय उत्थान होणार



**जमिया मिलीयामधील डॉ. हुसेन यांचें घर-जिथें वृद्धापकाळ निवान्तपणे घालवण्याची सुखस्वप्ने त्यांनीं पाहिली होती.**

नाही, तर त्यासाठी आपली संस्कृती संवर्धित करणारे राष्ट्रीय चारित्र्याचे धडे देणारे नवे शिक्षण तरुणांना देणे आवश्यक आहे. या शिक्षणसंस्थेने राष्ट्रीय विकासाच्या कार्याला चांगलीच

मदत करून स्वावलंबी शिक्षणाची पद्धत समाजात लोकप्रिय केली. आपले विद्यार्थी दायित्वपूर्ण नागरीक व्हावेत व त्यांना कलेची गोडी लागावी असे यत्न याच शिक्षणसंस्थेने भारतात प्रथम केले. १९२६ ते १९४८ पर्यंत कुलगुरू या नात्याने त्यांनी या संस्थेचा कारभार यशस्वीपणे सांभाळला. तनमन आणि धनाने राष्ट्रपती झाकिर हुसेन यांनी या संस्थेची सेवा केली व ती हयातभर केली यातच त्यांचे मोठेपण आहे. थोडक्यात राष्ट्रपती म्हणजे जमिया मिलिया व जमिया मिलिया म्हणजेच डॉ. झाकिर हुसेन असे जणू समीकरणच होय. ही संस्था म्हणजे डॉ. झाकिर हुसेन यांचे स्मारकच होय असे म्हणावयास हरकत नाही.

अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... नोंद दि. ...

## ५ विविध कार्य

म. गांधीजींनी डॉ. झाकीर हुसेन यांचे शैक्षणिक कार्य अतिशय जवळून पाहिले होते. गांधीजींनी राष्ट्रीय शिक्षणाचे विचार वेळोवेळी मांडले व ते मूर्त स्वरूपात आणण्यासाठी भारतातील दीर्घानुभवी शिक्षणतज्ज्ञांची एक समिती नेमली व तिच्या अध्यक्षपदी डॉ. झाकिर हुसेन यांची नेमणूक केली. त्यांच्या नेतृत्वाखाली देशात राष्ट्रीय शिक्षण–योजनेला आरंभ झाला. या योजनेच्या प्रचारासाठी त्यांनी ‘ नई तालीम ’ नावाचे एक मासिकही काढले होते. देशात ठिकठिकाणी दौरे काढून व्याख्याने देऊन योजनेची

माहिती व विचार त्यांनी मांडले. अशा प्रकारे त्यांनी गांधीजींच्या बनियादी शिक्षणयोजनेला साकार रूप दिले.



महात्मा गांधी जन्मशताब्दि वर्षाच्या प्रारंभी
श्रद्धांजली वाहताना डॉ. झाकिर हुसेन

पुढे अलिगढ मुस्लिम विद्यापीठाच्या विविध समस्या सोडविण्यासाठी कै. जवाहरलाल व पै. मौलाना अबुलकलम आझाद यांच्या सूचनेवरून अलिगढ विद्यापीठाच्या कुलगुरुपदी त्यांची नेमणूक १९४८ त करण्यात आली. या पदावर असताना त्यांनी त्या सर्व समस्या सोडविल्याच पण विद्यापीठाला चांगला नावलौकिक प्राप्त करून दिला. १९५४ पर्यंत ते त्या पदावर होते.

या थोर व्यक्तीचा निश्चित लोकसभेत उपयोग होईल या आशेने त्यांना निवडणुकीस उभे करण्याचे ठरले खरे, पण अखेरीस त्यांची नियुक्ती राज्यसभेत करण्यात आली. राज्यसभेत असताना त्यांनी मोठी मौलिक कामगिरी बजाविली. भारतीय प्रतिनिधी मंडळाचे सदस्य या नात्याने त्यांचा युनेस्कोशी संबंध आला. १९५६-५८ साली ते त्याच्या कार्यकारिणीवर सदस्य म्हणून निवडून गेले होते. १९५५पर्यंत ' इंटरनॅशनल स्टूडंटस सर्व्हिसच्या ' भारतीय समितीच्या अध्यक्षपदी ते होते. १९५५-५७ मध्ये जिनिव्हा येथील जागतिक विद्यापीठ सेवेचेही ते अध्यक्ष होते.

राज्यसभेतील त्यांची मुदत संपल्यावर १९५७ मध्ये त्यांना बिहारच्या राज्यपालपदावर नेमण्यांत आले. १९६२पर्यंत ते त्या पदावर होते. ही जबाबदारीची जागा त्यांनी मोठ्या प्रतिष्ठेने सांभाळली आणि बिहारसारख्या मागासलेल्या आणि यादवीने पोखरलेल्या राज्यात सुव्यवस्थित शासनाचा पाया घातला. या त्यांच्या कार्यावर खूष होऊनच की काय पंडितजींनी त्यांना

१९६२ साली भारताच्या उपराष्ट्रपतिपदावर नेऊन बसविले. संपूर्णपणे निःपक्षपाती वृत्ती आणि विशाल दृष्टी या गुणांना सुविद्य मन व सुजाण देशप्रीती यांची जोड मिळाल्यामुळे उपराष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांनी पाच वर्षांत देशभर फार मोठी लोकप्रियता मिळविली. याचाच परिणाम म्हणजेच की काय १९६७ साली राष्ट्रपतिपदावर ते घवघवीत यश मिळवून प्रचंड मतांनी निवडून आले होते.

## ६ • राष्ट्रपतींची अखेर

राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांनी आपल्या मिलनसार स्वभावामुळे स्वदेशात चांगलीच लोकप्रियता संपादन केली होती. आपल्या स्नेहपूर्ण वागणुकीमुळे इतर राष्ट्रांतून भारतात येणाऱ्या पाहुण्यांनाही ते आपुलकीने व अत्यादराने वागवत असत. इतर राष्ट्रांशी भारताचे जे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते त्याला कारण डॉ. झाकिर हुसेनच होत. असे हे गुणी राष्ट्रपती भारताला आणखीन काळ तरी लाभायला हवे होते. पण दुर्दैवाची गोष्ट !

शनिवार ता. ३ मे १९६९ हा दिवस राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांच्या आयुष्यातला अखेरचा दिवस. या दिवशीं राष्ट्रपती पैगंबरवासी होतील अशी कुणा कुणाला म्हणून कल्पना नव्हती. खुद्द राष्ट्रपतींनाही काळाची जरासुद्धा चाहूल लागलेली नव्हती. सारे काही व्यवस्थित होते. सकाळी अकरा वाजेपर्यंत राष्ट्रपतींनी आपले नित्याचे व्यवहार सुरळीतपणे पार पाडले.

नेहमीप्रमाणे त्यांनी न्याहारी केली व ते राष्ट्रपतिभवनातील छोट्या ' एडविना ' खोलीत वाचत बसले. त्यांची प्रकृती तपा-



नातीशी गप्पा मारणारे राष्ट्रपती

सण्यासाठी नेहमीप्रमाणे डॉक्टरमंडळी येऊन बसली. त्यांत त्यांचे वैयक्तिक डॉक्टर हरबन्सलाल, डॉ. आर. के. डोग्रा व विलिंग्डन इस्पितळाचे ब्रिगेडियर लाल हे होते. ११ च्या सुमारास राष्ट्रपती बाथरूममध्ये गेले व तिथेच त्यांना चक्कर आली. बाथरूममधून ते तात्काळ बाहेर आले व बिछान्यावर आडवे झाले आणि आडवे

झाले ते कायमचेच. हृदयविकाराचा तीव्र झटका हेच त्यांना चक्कर येण्याचे कारण होय आणि हा झटका इतका तीव्र होता की, तावडतोब वैद्यकीय मदत मिळूनही काही उपयोग झाला नाही. त्यांच्या शरीरात पुन्हा चेतना आणण्याचे प्रयत्न तज्ज्ञ डॉक्टरांनी तावडतोब सुरु केले. हे काम ११-५५पर्यंत चालू होते. यानंतर मात्र राष्ट्रपतींच्या निधनाची दुःखद वार्ता राष्ट्रपतिभवनातून प्रसृत करण्यात आली व ती वाऱ्यासरशी भारतात आणि अल्पावधीत जगभर पसरली. देश आणि सारी नेते मंडळी शोकसागरात बुडाली. राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात आले. राष्ट्रपतींच्या अंत्यदर्शनासाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रातील लोक राष्ट्रपतिभवनाच्या दिशेने येऊ लागले. त्यांचा नश्वर देह दरबारहॉलमध्ये दर्शनाकरिता ठेवण्यात आला. त्या देहाशेजारीच राष्ट्रपतींच्या पत्नी शाहजहान बेगम (वय वर्षे७०) व त्यांच्या दोन कन्यका बेगम झइदा खान व बेगम सफिया रेहमान या बसून होत्या. राष्ट्रपतींना एक धाकटे बंधू आहेत ते कराचीला असतात. त्यांचे नाव डॉ. महमूद हुसेन. ते पण आले. राष्ट्रपतींच्या मृत देहाचा दफनविधी सोमवार दिनांक ५ मे १९६९ रोजी सायंकाळी जमिया मिलियाच्या आवारात शाही इतमामाने करण्यात आला.

राजधानीत पाच लाख लोकांनी डॉ. झाकिर हुसेन यांचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या अंत्ययात्रेच्या प्रसंगी देशातील व परदेशांतील बडीबडी नेते मंडळी जातीने हजर होती व त्या सर्वांनी साश्रुनयनांनी दिवंगत नेत्याला श्रद्धांजली अर्पण केली.

राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन गेले. एक गुणी आणि चारित्र्य-संपन्न व्यक्ती जगाच्या डोळयापुढून क्षणार्धात कायमची नाहीशी झाली. मानवी जीवन किती क्षणभंगुर आहे याची प्रचीती मानवाला आली. जीवनाच्या विविध शाखांत मानवाने कितीही नेत्रदीपक प्रगती केली असली तरी अखेरीस ' त्या अदृश्य हाताची ताकद ' किती आहे आणि मानवाची बढाई किती पोकळ असते याचा पुरेपूर पडताळा राष्ट्रपतींच्या निधनाने आला आहे. खरोखरच मानव हा नियतीच्या हातातील एक सामान्य खेळणे आहे असेच म्हटले जाते ते अक्षरशः खरे आहे. दिवंगत राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांना भारतीयांचे शतशः प्रणाम.

## ७ • संग्राहक वृत्ती

डॉ. झाकिर हुसेन यांना प्राचीन अवशेष जमा करून ठेवण्याची विलक्षण आवड होती. प्राचीन अवशेष, दगड, प्राचीन बांधकामातील काही अवशेष यांचा फार मोठा साठा त्यांच्यापाशी आहे. यासाठी त्यांच्या निवासस्थानातील काही टेबलेही भरलेली आहेत. पण त्याशिवाय कितीतरी पेट्या पण गच्च भरलेल्या आहेत. हे सारे एकत्र करून त्यांची क्रमवार यादी करणे हे एक मोठे जिकिरीचे काम आहे. ते पूर्ण झाले की या अवशेषांचे प्रदर्शन भरविणार आहात काय ? असे एकदा त्यांना विचारले असता ते म्हणाले, हे अवशेष पहाण्याचा मनसोक्त आनंद मी स्वतः अद्याप लुटला नाही. माझं पूर्ण समाधान झालं की मी



गेल्या प्रजासत्ताकदिनी राजधानी दिल्लीत भरलेल्या अखिल भारतीय सांस्कृतिक मेळाव्यात महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक पथकाबरोबर 'मराठी' फेट्यात राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन.

मगच प्रदर्शन भरवीन. डॉ. झाकिर हुसेन यांचेकडे अवशेष तरी कोण कोणते आहेत, आहे माहीत ? इ. स. पूर्वी २००-३०० वर्षांपूर्वीच्या लाकुडकामाचे काही नमुने आहेत. त्यावर एक ग्रीक पेला आहे. हा पेला इ. स. पूर्वी ५०० वर्षांचा आहे. या पेल्या-वर अथेना ही विद्येची देवता एका सशस्त्र योद्ध्याशी लढाई करताना चित्रित केली आहे.

राष्ट्रपतींच्या संग्रहात रशियातील उरल पर्वतातील काही दगड व खनिज पदार्थ पण आहेत. हे सर्व एकमेकाला लावून ठेवले तर इंद्रधनुष्याच्या सप्त-रंगांची शोभा दिसते. किती तरी प्राण्यांचेही प्राचीन अवशेष त्यांच्या संग्रहात आहेत. ते बिहारचे राज्यपाल असताना भारत सरकारचे भूस्तर सल्लागार डॉ. टी. एन्. वाडिया यांनी त्यांना काही लाखो वर्षांपूर्वीच्या एका पानाचा प्रस्तरावशेष भेट म्हणून दिला होता. तोही या संग्रहात आहे. डॉ. झाकिर यांनी १९६० साली भूस्तरशास्त्रविषयक एक ग्रंथ वाचला व तेव्हापासून त्यांना प्राचीन अवशेष जमा करण्याचा जणू छंदच जडला. ते जेव्हा प्रवासात जिथे जिथे जात तिथे तिथे ते अशा अवशेषांची चौकशी करीत व जमतील तेवढे घेऊन येत. त्यांचा हा जुन्या वस्तू जमविण्याचा नाद इतिहासप्रेम दाखवितो.

## ८ • आवडता छंद — बागकाम

डॉ. झाकिर हुसेन यांचा अत्यंत आवडता छंद म्हणजे बागकामाचा. नवी दिल्लीतील मौलाना आझाद रोडवरील त्यांच्या



राष्ट्रपती डॉ. हुसेन आपल्या उद्यानातील फुलांची काळजी घेत असत.

राष्ट्रपतिभवनाच्यासभोवती जो बगीचा आहे तो राजधानीतील एक छानदार बगीचा म्हणून ओळखला जातो. रोज सकाळी या बगीच्यात तासभर रमल्याशिवाय त्यांना चैनच पडत नसे. तिथे ते कात्री घेऊन झाडाच्या फांद्या कापताना दिसत, तर कित्येकदा पाणी घालतानाही आढळत. विविध प्रकारची फुलझाडे आणि वेली यांचीही मनोहर रचना त्यांनी आपल्या बागेत केली आहे.

डॉ. झाकिरना पं. जवाहरलाल नेहरू यांच्याप्रमाणेच गुलाबांची फुले अतिशय आवडत. त्यांच्या बागेतला फार मोठा विभाग केवळ गुलाबांच्यासाठी राखून ठेवलेला आहे. तऱ्हेतऱ्हेची गुलाबाची झाडे तिथे आहेत आणि गुलाबाच्या हंगामात तर हा विभाग विशेषच खुलतो. डॉ. झाकिर हे स्वतः गुलाबाच्या झाडावर कलमे करीत आणि यातूनच त्यांनी काही नव्या जाती तयार केल्या आहेत. त्यांनी या जातींना दिलेली नावेही उल्लेखनीय अशीच आहेत. एका जातीचे नाव राधाकृष्णन, दुसरीचे डॉ. झाकिर हुसेन, तिसरीचे सी. एफ. ॲन्ड्र्यूज, तर चौथीचे कमला असे आहे. पाटण्याला राजभवनात असताना तिथेही त्यांनी गुलाबाचा उत्कृष्ट बगीचा तयार केला होता. त्यांच्या एका मित्राने पॅरिसहून काही जातींचे गुलाब पाठविले होते. या जातींचा खास विभाग दिल्लीच्या त्यांच्या बगीच्यात आहे. या जाती त्यांना मिळाल्या व त्यांचा हा मित्र निधन पावला. डॉ. झाकिरना

यावेळी अतिशय दुःख झाले. हा नवा गुलाब-विभाग त्या मित्राचे स्मारक आहे असे डॉक्टरसाहेब नेहमी म्हणत. आपल्या निवासस्थानाच्या वऱ्हांड्यात निवडुंगांचे ( कॅकटस ) अनेक प्रकार डॉ. झाकिर यांनी लावलेले आहेत. फुले व मुले यांत डॉ. झाकिर हुसेन सारखेच रममाण होत असत.

## ९ • उत्कृष्ट लेखक

डॉ. झाकिर हुसेन उत्कृष्ट लेखक होते. अर्थशास्त्र हा त्यांचा अत्यंत आवडता विषय होता. या विषयावर त्यांनी काही पुस्तकेही लिहिली आहेत. ' कॅपिटॅलिझम ', ' ॲन एसे इन अंडरस्टँडिंग, ' ' लेक्चर्स ऑन स्कोप ॲन्ड मेथड ऑफ इकॉनॉमिक्स ' ही त्यांनी लिहिलेली पुस्तके प्रसिद्ध आहेत. प्लेटोच्या ' रिपब्लिक'चे छानदार उर्दूत भाषांतर करून त्यांनी आपल्या साहित्यिक जीवनास सुरुवात केली. यावरूनच त्यांच्या राजकीय व अर्थशास्त्रविषयक तत्त्वज्ञानाची कल्पना येईल. ध्येयनिष्ठा आणि त्यांची सुधारणा-वादी मनोवृत्ती प्लेटोच्या तत्त्वज्ञानातूनच त्यांनी घेतली आणि यातूनच त्यांचे स्वतंत्र जीवनविषयक तत्त्वज्ञान निर्माण झाले. ' लिटझ ' या जर्मन अर्थशास्त्रज्ञाच्या ' नॅशनल सिस्टिम ऑफ रिपब्लिक ' व एडविन कॅनन याचे ' एलेमेंटस ऑफ इकॉ-नॉमिक्स ' या ग्रंथांचेही त्यांनी उर्दूत भाषांतर केले असून लहान मुलांसाठीही त्यांनी कितीतरी चांगली पुस्तके लिहिली आहेत.

प. क्र. ..926 ४.२ ...... दि ..................
दि. ...................................



'शिक्षा' नावाचे एक सुंदर हिंदी पुस्तक त्यांनी अलिकडेच लिहिले. त्यांच्या लेखन-भाषणात पांडित्याचा आणि विद्वत्तेचा बडिवार आणि प्रदर्शन क्वचितच असे, तरीही त्यांच्या विचारांची विशालता आणि खोली त्यांच्या व्यासंगाची साक्ष देतात. कला, साहित्य, धर्म, विज्ञान, व्यापार अशा क्षेत्रांत राज्याने लुडबूड करू नये असे ते मानीत असत. पण जेव्हा शांतता व सुव्यवस्थेस धोका येईल आणि मानवी जीवन विस्कळित होऊन जाईल तेव्हाच राज्याने कोणत्याही क्षेत्रात हस्तक्षेप करावयास हरकत नाही, असे आपल्या लिखाणातून त्यांनी प्रतिपादिले आहे. इंग्रजी, उर्दू, अरबी व पार्शियन या भाषांचे ते प्रभू होते. याच भाषांतून त्यांनी ग्रंथलेखन केलेले आहे. त्यांनी प्रौढांसाठी अनेक उत्कृष्ट लेख लिहिलेले आहेत. महात्मा गांधीजींचेही त्यांनी चरित्र लिहिले असून ते उद्बोधक आहे. म. गांधी व जवाहरलाल नेहरू यांचे त्यांच्यावर अतिशय प्रेम होते. ते गांधीवादी विचारसरणीचे होते. त्यांच्या लेखनावर मौलाना अबुलकलम आझाद यांचा खूप परिणाम झालेला होता.

भाषणापेक्षा लेखनावर त्यांचा जास्त भर होता. पण शिक्षण घेत असताना त्यांनी 'केंब्रिज स्पीकर्स प्राइज' हे भाषण पारितोषिक पटकावले होते ही गोष्ट फारच थोड्यांना माहीत असेल.

... ग्रंथालय ...
अनुक्रम 0६५७५ दि. ...
क्रमांक ...३६९७८... नोंद दि. ...३०।३।४७

डॉ. झाकिर हुसेन हे थोर शिक्षणतज्ज्ञ होते. ते शिक्षणतज्ज्ञ म्हणून जेवढे ओळखले जात तेवढे ते राजकारणी व अर्थतज्ज्ञ म्हणून ओळखले जात नसत. मानवी जीवन हे एक सामूहिक जीवन आहे असे ते मानीत व यातूनच त्यांच्या राजकीय आणि अर्थविषयक तत्त्वज्ञानाने आकार घेतला. ते एक थोर शिक्षणशास्त्रज्ञ व कट्टे राष्ट्रवादी होते. डॉ. राधाकृष्णन् यांच्यामागून राष्ट्रपति-पदावर आलेले झाकिर हुसेन हे पण राधाकृष्णन् यांच्याप्रमाणेच शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी शिक्षण हेच आपल्या जीवनाचे कार्य ठरवले होते आणि राष्ट्रपती झाल्यावरही त्यांचे अधिकांश लक्ष शिक्षणक्षेत्राकडेच लागलेले असायचे. डॉ. झाकिर हुसेन हे अव्वल-पासून अखेरपर्यंत भारतीय होते. ते भारतीय शाश्वतमूल्यांचे उपासक होते आणि संयमी पण पराक्रमी कृतिशूर होते. भारतात एक शिक्षकपेशाचा सद्प्रवृत्त गुणी माणूस राष्ट्रपदपदी निवड होऊन त्या पदाला उजाळा देऊ शकतो हे भारताचे वैशिष्ट्य होय.

शिक्षणक्षेत्राद्वारे आपले उभे आयुष्य राष्ट्रसेवेस वाहून घेणाऱ्या काही थोड्या भारतीय राष्ट्रभक्तांपैकी डॉ. झाकिर हे एक होते. १९२० साली दिल्ली येथे ‘ जमिया मिलिया ’ ही आदर्श शिक्षण-संस्था त्यांनी स्थापन केली. यासाठी महात्मा गांधीजींचे मन त्यांनीच वळविले होते. व्यापक पायावरील राष्ट्रीय पुनरुत्थान हे

राजकारणाच्या संकुचित मार्गाने केव्हाही होऊ शकणार नाही, तर शिक्षण व संस्कार याबाबतचा नवा दृष्टिकोण आणि राष्ट्रीय चारित्र्याचा नवा साचा यातूनच हे साध्य होऊ शकेल असा त्यांचा विश्वास होता. डॉ. हुसेन यांना इंग्रजी शिक्षणाची प्रचलित पद्धती संकुचित, साचेबंद आणि निकस वाटत होती. राष्ट्रीय संस्कृतीचा मूलाधार असणारी नवी शिक्षणपद्धती आपल्या जमिया मिलियाद्वारे रूढ करण्याचे उद्दिष्ट त्यांनी आपल्यासमोर ठेवले होते.

डॉ. झाकिर हुसेन धर्मनिष्ठ मुसलमानांनी चालविलेल्या "महॉमेडन अँग्लो-ओरिएंटल कॉलेज—सध्याच्या अलिगड विद्यापीठाची मूळसंस्था—मध्ये एम. ए.च्या वर्गात शिकत असताना महात्मा गांधीजींनी अली बंधूंसह या संस्थेस भेट दिली होती. त्यावेळी तिथे भाषण करताना बापूंनी ब्रिटिश पद्धतीप्रमाणे येथे चाललेल्या शिक्षणसंस्थांवर बहिष्कार टाकला पाहिजे असे मत व्यक्त केले. याचबरोबर राष्ट्रीय शिक्षणपद्धतीची केंद्रे ठिकठिकाणी सुरू करण्याचेही आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांसमोर केले. झाकिर हुसेननी राष्ट्रपित्याच्या आवाहनास तिथल्या तिथे साद दिली आणि आपल्या काही सहकाऱ्यांच्या समवेत त्यांनी एका शिक्षण संस्थेची स्थापना केली. तिचेच नाव 'जमिया मिलिया इस्लामिया'. राष्ट्रीय वृत्तीचे आणि बाण्याचे विद्यार्थी तयार करणारे विद्यापीठ असा या संस्थेच्या नावाचा अर्थ आहे. जमिया मिलिया-

द्वारे डॉ. झाकिर यांनी नवी शिक्षणपद्धती प्रचारात आणली आणि राष्ट्रीय संस्कृतीत तिची मुळे खोलवर रुजली गेली. जीवन व शिक्षण या दोहोंबाबतीत समाजदृष्टिकोण विकसित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पहिल्या प्रायोगिक संस्थांपैकी ती एक संस्था होय आणि जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्शून जाणाऱ्या गोष्टी तीत होत्या. आपल्या शिक्षणविषयक कल्पनांची प्रयोगशाळा म्हणून गांधीजी जमिया मिलियाकडे पाहात आणि शिक्षणविषयक समस्यांबाबत ते नेहमी डॉ. झाकिर यांचाच सल्ला घेत असत. यामुळेच की काय झाकिरसाहेब गांधीजींकडे जे आकर्षित झाले होते ते अगदी अखेरपर्यंत अक्षरशः गांधीवादीच राहिले.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. झाकिर हे प्रामुख्याने शिक्षणसिद्धांत व पद्धती यांत गुंतलले होते. या क्षेत्रातील त्यांच्या महान् सेवेबद्दल १९५४ साली त्यांना ‘पद्मविभूषण’ ही पदवी बहाल करण्यात आली होती आणि १९६३ मध्ये त्यांना ‘भारत-रत्न’ हा सर्वोच्च किताब सन्मानाने देण्यात आला होता.

## ११ • राष्ट्रपतींचे पहिले भाषण

ता. १३ मे १९६७ रोजी राष्ट्रपतिपदावर विराजमान झाल्यावर उपस्थित श्रोत्यांसमोर राष्ट्रपती या नात्याने त्यांनी जे पहिले भाषण केले ते असे —

" भारतीय जनतेने माझ्यावर जो विश्वास दाखविला आहे त्यामुळे मी अक्षरशः भारावून गेलो आहे. अत्यंत विनम्र भावाने आणि समर्पणाच्या भावनेने मी हे पद स्वीकारीत आहे. जगात शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न भारताकडून पूर्वीप्रमाणेच केले जातील. त्यासाठी भारत अधिक बलशाली, बलदंड करावयास हवा. आपण राष्ट्रोन्नतीसाठी महात्मा गांधीजींचाच मार्ग आचरू या. " याच संदर्भात झाकिर हुसेन पुढे म्हणाले, " मानवाच्या किमान आवश्यक गरजा पुरविण्याचे कार्य सरकार करील. त्याच-प्रमाणे वैचारिक शैथिल्य, सामाजिक न्यायाच्या मागणीबाबत असलेली उदासीनता व संकुचित स्वार्थाचे उच्चाटण करण्यासाठी लक्ष दिले जाईल. काम, अधिक काम ही आपली घोषणा बनली पाहिजे. संपूर्ण भारत हे माझे घर आहे. भारतीय जनता माझे कुटुंबीय आहेत. या कुटुंबाचा प्रमुख म्हणून माझी निवड झाली आहे. कुटुंबप्रमुखाच्या नात्याने घर हे भक्कम आणि सुंदर करणे माझे कर्तव्य आहे. त्यासाठी ज्यांच्या हाताखाली मी पाच वर्षे काम केले त्या महान थोर विचारवंत शिक्षणतज्ज्ञांच्या, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या मार्गाने जाण्याचा मी प्रयत्न करीन. "

याच भाषणात डॉक्टरसाहेबांनी मावळते राष्ट्रपती, भारताचे थोर सुपुत्र डॉ. राधाकृष्णन यांचा गौरव केला. भारताचा थोर, महान सुपुत्र, मार्गदर्शक, तत्त्वज्ञ मित्र या शब्दात त्यांच्यावर स्तुतिसुमनांचा त्यांनी वर्षाव केला. राष्ट्रपतिपदी निवड करून

जनतेनेच आपणावर जो विश्वास दाखविला त्याबद्दल आभार मानून ते शेवटी म्हणाले, " राष्ट्रीय शिक्षणाला वाहून घेण्याचे मी ४७ वर्षांपूर्वी ठरविले होते. मी एक केवळ साधा शिक्षक असताना मला राष्ट्रपतिपदाचा मान मिळाला. जनतेच्या या विश्वासास पात्र राहाण्याचा मी प्रयत्न करीन. "

## १२ • राष्ट्रपतींची विचारसुमने

• जनतेची, शेजाऱ्याची व मानवाची सेवा हीच खरीखुरी ईश्वराची सेवा होय.

• आपण हाती घेतलेल्या प्रत्येक कामामधून शिक्षण मिळेल असे नाही तर मनाला ज्यावेळी चालना मिळते त्याचवेळी शैक्षणिक कार्य होते.

• समान आदर्शांच्या आराधनेसाठी सहवास व सहकार्य करणाऱ्या सदस्यांचा समुदाय म्हणजेच विद्यालय !

• श्रेष्ठ आदर्शांचे अमृत स्वतःच्या हृदयरूपी कलशात भरून विद्यार्थ्यांच्या अंतःकरणावर त्याचा अभिषेक करणे हे शिक्षकाचे खरे कार्य होय.

• उज्ज्वल भवितव्यासाठी भारतीय जनतेने खूप आणि सातत्याने कष्ट केले पाहिजेत.

• विचार करून कोणतेही काम करा आणि काम करता करता विचार करा.

• आपल्या राष्ट्रीय जीवनाचा पाया नि संस्कृतीचे संरक्षक ठिकाण म्हणजे घर होय.

• चांगल्या गोष्टींची माहिती असताना वाईट गोष्टींवर समाधान मानणे म्हणजे पापाचरण करणे होय.

• लोकशाही राज्यपद्धतीत शिक्षणाला जिवंत शरीरातील श्वासोच्छ्वासाइतके महत्त्व आहे.

• हुकूम चालविणे अगर सत्ता गाजविणे हे शिक्षकाचे कार्य नसून साहाय्य अन् सेवा; सहानुभूती अन् संस्कार; आदर, प्रेम व श्रद्धा ही त्याची ब्रीदे होत.

• समाजाचा तथा देशाचा विकास व्याख्याने झोडल्याने किंवा केवळ लेख खरडल्याने होणार नाही. तंटे-बखेडे किंवा केवळ कृतिशून्य बडबडही नको. तर जास्तीत जास्त कार्यालाही खूप मेहनत हवी. त्यातच समाजाचे उज्ज्वल भवितव्य आहे.

• आपले जीवन अधिक परिपूर्ण करण्यासाठी व त्यामध्ये अधिक ज्ञान निर्माण करण्यासाठी आपण प्रामाणिकपणाने व तळमळीने प्रयत्न केले पाहिजेत.

• भारताचे पहिले गव्हर्नर जनरल व ज्येष्ठ नेते चक्रवर्ती राजगोपालाचारीयर म्हणतात, गांधीजींच्या स्वातंत्र्यलढ्यात अलिबंधूंनी भरती केलेल्या सैनिकांपैकी राष्ट्रपती झाकिर हुसेन एक होते. त्यांच्याइतका सर्वश्रेष्ठ नागरिक या देशात कुणी नव्हता. माझ्या इतर देशबांधवांसमवेत मी राष्ट्रपतींना श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

• माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात– डॉ. झाकिरसाहेब यांच्या आकस्मिक निधनाचे वृत्त ऐकून मनस्वी दुःखाचा धक्का बसला. ते एक महान सद्गृहस्थ व निष्णात शिक्षणतज्ज्ञ होते, ते स्वतःच्या कर्तबगारीवर पुढे आले. त्यांच्या दुःखी कुटुंबियांच्या भावनात मी सहभागी आहे.

• केंद्रीय गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण म्हणाले– डॉ. झाकिर हुसेन हे भारतीय संस्कृती व परंपरेचे आदर्श प्रतीक होते. देशाच्या आशा-आकांक्षा त्यांच्यात प्रतीत होत होत्या. सद्यःस्थितीत त्यांचे मार्गदर्शन अत्यावश्यक होते.

• तामीळनाडूचे मुख्यमंत्री श्री. करुणानिधी म्हणतात–भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन म्हणजे साक्षात विनम्रतेची मूर्तीच होती. ते सुसंस्कृत बुद्धिमान तर होतेच पण त्याजबरोबर ते एक थोर स्वातंत्र्ययोद्धे, महात्माजींचे अनुयायी आणि हिंदुमुस्लिम

ऐक्याचे प्रतीक होते. त्यांच्या निधनाने राष्ट्राला फार मोठा धक्का बसला आहे. त्यांचे नाव चिरंतन राहील.

• केंद्रीय मजूरमंत्री जयसुखलाल हाथी म्हणतात–राष्ट्रपतींचे निधन ही एक फार मोठी हानी आहे. आपण एका महान देश-भक्तास, एका महापंडितास, एका थोर शिक्षणतज्ज्ञास आणि एका खऱ्याखुऱ्या सद्‌गृहस्थास मुकलो आहोत.

• केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. राव म्हणतात–आपण एका चांगल्या सद्‌गृहस्थास मुकलो आहोत. ते अत्यंत सौजन्य-शील होते.

• पश्चिम बंगालचे उपमुख्यमंत्री श्री. ज्योती बसू म्हणतात–राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांचे निधनवृत्त खरोखरच धक्कादायक आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात मी सहभागी आहे.

## १४ राष्ट्रपति डॉ. झाकिर हुसेन यांचा जीवनपट

८ फेब्रुवारी १८९७–हैद्राबाद येथे धार्मिक, कर्मठ सुनी पंथीय मुसलमान कुटुंबात जन्म. प्राथमिक शिक्षण हैद्राबाद येथे. माध्यमिक शिक्षण इटावा येथे.

१९२०–एम. ए. सन्मानासह उत्तीर्ण.

१९२१–राष्ट्रपिता गांधीजींचे नेतृत्व मानून असहकाराच्या चळवळीत उडी घेतली.

१९२६– बर्लिन विद्यापीठाची ‘डॉक्टरेट’ पदवी सन्माना-सह मिळविली.

–भारतांत परतल्यावर दिल्लीतील 'जमिया मिलिया इस्लामिया' या शिक्षणसंस्थेचे उपकुलगुरुपद. हे जबाबदारीचे पद सतत २२ वर्षे सांभाळले. याच काळात शिक्षणविषयक लेख व विचार मांडले. शैक्षणिक कार्यास वाहून घेतले. नवनवीन शैक्षणिक प्रयोग व उपक्रम केले.

१९३७–राष्ट्रीय मूलोद्योग समितीचे अध्यक्ष. सतत अकरा वर्षे मूलोद्योग शिक्षणाचे अध्वर्यू. या विषयावरील व्यासंगी, विचारवंत म्हणून मानमान्यता.

१९४८–अलिगढ विद्यापीठाचे उपकुलगुरू. तसेच अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विविध समित्यांचे कुशल नेतृत्व केले.

१९५४–'पद्मविभूषण' ही बहुमानाची पदवी सरकारतर्फे बहाल करण्यात आली.

१९५६–'सेंट्रल बोर्ड ऑफ एज्युकेशन' चे सदस्य. अनुदान मंडळ, राज्यसभा, युनेस्कोचे प्रतिनिधी. पटेल स्मारक व मावळणकर स्मारक व्याख्यानमालेत विचारपरिप्लुत व्याख्याने.

१९५७–बिहार राज्याचे राज्यपाल म्हणून नेमणूक. हे पद पाच वर्षे सांभाळून राज्याचे नेतृत्व उत्तम प्रकारे केले.

११ मे १९६२–भारताच्या उपराष्ट्रपतिपदी निवड.

१९६३ 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब बहाल करण्यात आला. देशात सर्वत्र मानसन्मान, सत्कार समारंभ करण्यात आले.

१९६४–भारताचे उपराष्ट्रपती म्हणून संयुक्त अरब राज्ये, मोरोक्को, अल्जेरिया, ट्युनेशिया, कुवेत या देशांत सदिच्छा दौरा काढला.

१९६५–सौदी अरेबिया, जॉर्डन, ग्रीस, रशिया या देशांचा दौरा करून लोकशाही, स्वतंत्र व प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करणाऱ्या स्वतंत्र भारताची भूमिका स्पष्टपणे समजावून सांगितली.

६ मे १९६७ राष्ट्रपतिपदासाठी निवडणूक.

९ मे १९६७ निवडणुकीचा निकाल जाहीर. राष्ट्रपतिपदी प्रचंड बहुमताने निवड. देशातून व परदेशांतून अभिनंदनाचा वर्षाव.

१३ मे १९६७. अधिकारग्रहणानिमित्य दिल्ली येथे शानदार भव्य नि चित्ताकर्षक सोहळा. पहिले भाषण करून भारतीय जनतेला अभिवादन व एकजुटीचे आवाहन केले.

जून १९६७–भारताचे राष्ट्रपती म्हणून रशिया व कॅनडा येथे दौरा. सर्वत्र मानसन्मान व अपूर्व स्वागतसोहळे.

१५ ऑगस्ट १९६७–स्वतंत्र भारताला स्वातंत्र्य-दिनानिमित्त संदेश दिला. स्वातंत्र्याचा वारसा जतन करून ठेवण्यासाठी आत्मसंयमाने आणि शिस्तबद्धतेने वागू या असे आवाहन.

३ मे १९६९–दिल्लीत जीवनज्योत एकाएकी विझली.

५ मे १९६९–जमिया मिलीया येथे दफनविधी.

मराठी ग्रंथ संग्रहालय शाखा.
अनुक्रम
क्रमांक

# गम्मत जम्मत

लहान मुलांना चटकदार गोष्टी वाचण्याची भारी हौस, तें लक्षांत घेऊनच त्यांना आवडतील अशींच छान छान व गमतीदार गोष्टींच्या पुस्तकांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

## राजा हरिश्चंद्र

सुंदर मुखपृष्ठ : ३२ पृष्ठें : मूल्य ३० पैसे

## नामयाची जनी

सुंदर मुखपृष्ठ : ३२ पृष्ठें : मूल्य ३० पैसे

## बोलका कावळा व इतर गोष्टी

सुंदर मुखपृष्ठ : ३२ पृष्ठें : मूल्य ३० पैसे

## बिरबल आणि बादशहा, भाग १ ते ४

सुंदर मुखपृष्ठ : प्र० ३२ पृष्ठें : प्र. मूल्य ३० पैसे

## गडबडरावांची गम्मत

सुंदर मुखपृष्ठ : ३२ पृष्ठें : मूल्य ३० पैसे

## जादूचा पलंग

सुंदर मुखपृष्ठ : ३२ पृष्ठें : मूल्य ३० पैसे

फारच चटकदार आहेत या गोष्टी आणि शिवाय सोप्या भाषेंत रंगवून लिहिल्यामुळें तर मुलांना याच गोष्टी जास्त आवडतील. आजच मागवा.

---

बा. ल. पाठक प्रकाशन, मोतीबाजार पुणे २

IRBK-0112742